# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांची गुरुभेट आणि त्यांनी गुरुंकडून शिकणे

## विषयसूची


१. डॉ. जयंत आठवले यांचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ६

२. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचा संक्षिप्त परिचय ८

३. युगप्रवर्तक असे परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अलौकिक चरित्र असलेली वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथमालिका ! १२

४. 'परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचा साधनाप्रवास' ही मालिका म्हणजे, 'आदर्श साधक' बनण्यासाठीचे बोधामृत ! १९

५. प्रस्तुत ग्रंथातील लिखाणाच्या द्विरुक्तीचे अपरिहार्य कारण ! २४

६. ग्रंथातील काही संबोधने आणि उपाधी यांविषयीची स्पष्टीकरणे २५


## ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणातील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले साधनेकडे वळणे** **२७**

१ अ. परात्पर गुरु डॉ. आठवले पूर्वी देवाचा विचार न करणारे अन् बुद्धीप्रामाण्यवादी असणे २७

१ आ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांना संमोहन उपचारांची मर्यादा लक्षात येणे आणि ते साधनेकडे वळणे २८

**प्रकरण २. परात्पर गुरु डॉ. आठवले यांना गुरुप्राप्तीच्या आधीपासूनच गुरूंनी संतांच्या माध्यमातून अध्यात्म शिकवणे आणि त्यांचे रक्षण करणे** **३१**

**प्रकरण ३. डॉ. आठवले यांनी गुरुप्राप्तीपूर्वी केलेला अध्यात्मप्रसार** **३५**

३ अ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी अध्यात्म शिकण्यासाठी २५ हून अधिक संतांकडे जाणे आणि साधनेला आरंभ करणे ३५

| | | |
|---|---|---|
| ३ आ. | परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी आरंभीच्या काळात केलेला अध्यात्मप्रसार | ३५ |
| **प्रकरण ४.** | **प.पू. अण्णा करंदीकर यांनी डॉ. आठवले यांना घडवलेली गुरुभेट !** | ३९ |
| ४ ऊ. | डॉ. आठवले यांना प.पू. भक्तराज महाराज यांच्याकडून गुरुमंत्र मिळणे | ४४ |
| **प्रकरण ५.** | **परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे गुरूंकडून शिकणे** | ४९ |
| ५ आ. | प.पू. भक्तराज महाराज यांनी (प.पू. बाबांनी) नामसाधनेविषयी शिकवणे | ५० |
| ५ उ. | डॉ. आठवले यांचे ‘गुरूं’च्या संदर्भातील शिकणे | ५३ |
| ५ ऊ. | डॉ. आठवले यांचे ‘गुरु-शिष्य’ यांच्या संदर्भातील शिकणे | ५६ |
| ५ ए. | डॉ. आठवले यांचे ‘परेच्छा’ अन् ‘ईश्वरेच्छा’ यांविषयी शिकणे | ५८ |
| ५ औ. | प.पू. बाबांनी अहं-निर्मूलनाविषयी शिकवणे | ५९ |
| ५ ग. | ‘भक्तांचा विचार कसा करावा ?’, हे प.पू. बाबांनी शिकवणे | ६४ |
| ५ घ. | गुरुबंधूंवर टीका करू नये ! | ६४ |
| ५ झ. | साक्षीभावाविषयी शिकवणे | ६७ |
| ५ ट. | अद्वैताकडे जाण्यास शिकवणे | ६७ |
| ५ ड. | अप्रत्यक्ष शिकवणे | ६८ |
| **प्रकरण ६.** | **परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी गुरुचरणी तन-मन-धन अर्पण करणे** | ७७ |
| **प्रकरण ७.** | **परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे त्यांच्या गुरुपरिवारातील संतांशी असलेले भावबंध** | ८४ |
| **प्रकरण ८.** | **परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या ‘अध्यात्मशास्त्र’ या पहिल्या ग्रंथातून पुष्कळ चैतन्य प्रक्षेपित होत असल्याचे दर्शवणारी वैज्ञानिक चाचणी** | ८८ |

# ‘परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा साधनाप्रवास’ ही मालिका म्हणजे, ‘आदर्श साधक’ बनण्यासाठीचे बोधामृत !

## १. गुरुप्राप्तीनंतर केवळ ३ – ४ वर्षांतच ‘गुरु’पदाला पोचलेले परात्पर गुरु डॉ. आठवले !

‘सर्वसाधारणपणे गुरुप्राप्ती झाल्यानंतर काही वर्षे गुरूंच्या मार्गदर्शनानुसार कठोर साधना आणि सेवा केल्यानंतर एखादा शिष्य ‘गुरु’ पदाचा अधिकारी बनू शकतो. परात्पर गुरु डॉ. आठवले आरंभी देवाचा विचार न करणारे होते; परंतु अध्यात्माचे महत्त्व कळल्यावर त्यांनी अध्यात्मशास्त्राचा अभ्यास आणि साधना केली. त्यांच्या तळमळीमुळे त्यांना शीघ्र गुरुप्राप्ती झाली. यानंतर गुरूंच्या मार्गदर्शनाखाली साधना करून ते केवळ ३ – ४ वर्षांतच गुरुपदाला पोचले ! यावरून त्यांच्यातील उत्तम शिष्याचे दर्शन घडते. ‘एवढ्या अल्प कालावधीत ते गुरुकृपेस कसे पात्र ठरले ?’, याचे कुतूहल काहींना वाटू शकते. त्यांचे हे कुतूहल या ग्रंथमालिकेवरून शमेल.

## २. साधकांची आध्यात्मिक जडणघडण चांगली होण्यासाठी साधनेचे विविध पैलू बारकाव्यांनिशी शिकवणारी ग्रंथमालिका !

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत रामदासस्वामी यांसारख्या अनेक संतांची चरित्रे आज उपलब्ध आहेत. त्यांमध्ये त्यांचे लौकिक जीवन, साधनामार्ग, शिकवण, लीला, भक्तांच्या अनुभूती इत्यादी वाचायला मिळते. या संतांच्या आध्यात्मिक जडणघडणीमध्ये ‘त्यांच्या मनाची विचारप्रक्रिया कशी झाली ? लहान-सहान प्रसंगांतूनही गुरूंनी त्यांना कसे शिकवले ? साधकावस्थेच्या पुढच्या पुढच्या टप्प्यांमध्ये

त्यांच्या साधनेच्या दृष्टीकोनांत कसे पालट झाले ? त्यांनी टप्प्याटप्प्याने तन-मन-धन यांचा त्याग कसा केला ? गुरूंनी त्यांना समष्टी साधनेची शिकवण कशी दिली ?' इत्यादी अनेक पैलूंच्या बारकाव्यांनिशी लिहिलेले बहुधा कुठे आढळत नाही. साधकांना ही माहिती त्यांच्या साधनेतील शीघ्र प्रगतीसाठी लाभदायक ठरते. परात्पर गुरु डॉक्टरांच्या 'साधनाप्रवास' या ग्रंथमालिकेतून हा उद्देश निश्चितच साध्य होईल.

## ३. परात्पर गुरु डॉक्टरांनी लिहिलेल्या साधनाप्रवासाच्या निमित्ताने त्यांच्या काही गुणांचे घडलेले दर्शन !

**३ अ. जिज्ञासा आणि संशोधक वृत्ती :** सर्वसाधारणपणे साधक किंवा शिष्य गुरूंना प्रश्न विचारत नाहीत; केवळ त्यांनी सांगितलेले ऐकतात. परात्पर गुरु डॉक्टर गुर्वाज्ञापालनासह त्यांच्यातील जिज्ञासेमुळे गुरूंना अध्यात्मातील अनेक प्रश्न विचारून पुष्कळ शिकत असत. त्यांच्यातील संशोधक वृत्तीमुळेही ते अध्यात्मातील अनेक तत्त्वे शिकू शकले. अर्थातच याचा उपयोग त्यांना समष्टीला अध्यात्मशास्त्र शिकवण्यासाठीही करता आला.

**३ आ. चिंतनशील वृत्ती :** परात्पर गुरु डॉक्टर साधकावस्थेत असतांना प्रत्येक प्रसंगाचा बुद्धीने विश्लेषणात्मक अभ्यास करत, तसेच त्या वेळी स्वतःच्या मनाचाही अभ्यास करत. त्यातून त्यांना साधनेचे वेगवेगळे पैलू उलगडत असत. याचे एक उदाहरण याप्रमाणे आहे. परात्पर गुरु डॉक्टरांना गुरुप्राप्तीच्या आधीपासूनच विविध संतांनी अध्यात्म शिकवले आणि त्यांचे वाईट शक्तींच्या त्रासांपासून रक्षणही केले. यासंदर्भात परात्पर गुरु डॉक्टर सांगतात, 'संतांनी मला अध्यात्म शिकवणे आणि माझे संकटांपासून रक्षण करणे, हे सर्व गुरूंनीच केले होते, हे मला फार वर्षांनी एकदा गुरु सहज बोलून गेलेल्या पुढील वाक्यावरून समजले - "तुमचे गुरु थोर म्हणून तुम्ही हे सर्व शिकलात आणि (वाईट शक्तींपासून) वाचलात !"

परात्पर गुरु डॉक्टरांच्या अशा चिंतनशील वृत्तीची अनेक उदाहरणे या ग्रंथमालिकेत दिली आहेत. यावरून साधकांना 'साधनेविषयीचे चिंतन कसे करायचे ?', याचा उत्तम बोध होईल.

**३ इ. प्रांजळपणा :** परात्पर गुरु डॉक्टरांनी त्यांना गुरूंकडून शिकायला मिळालेली सूत्रे लिहितांना स्वतःच्या प्रतिमेचा कोणताही आडपडदा न ठेवता ती लिहिली आहेत, उदा. गुरु काही वेळा त्यांना अकारण रागवायचे, हेही त्यांनी प्रांजळपणे लिहिले आहे.

**३ ई. सूत्रांच्या तत्परतेने नोंदी करणे :** वर्ष २०११ मध्ये एकदा मी परात्पर गुरु डॉक्टरांच्या खोलीत त्यांना सेवेच्या संदर्भातील शंका विचारण्यासाठी गेलो होतो. त्या वेळी ते स्नानाला जात असतांना कागद-लेखणी सोबत घेऊन जात होते. याचे मला आश्चर्य वाटल्याचे त्यांना समजल्यावर ते मला म्हणाले, ''अंघोळ करतांना काही सुचले, तर लगेच लिहून ठेवतो; नाहीतर नंतर विसरायला होते.'' परात्पर गुरु डॉक्टरांमध्ये 'सूत्रांच्या तत्परतेने नोंदी करणे', हा गुण उपजतच असल्यामुळे साधनेला आरंभ केल्यापासून आजतागायत त्यांना साधनाप्रवासातील विविध टप्प्यांवर शिकायला मिळालेली सूत्रे, ईश्वर सुचवत असलेले विविध विषयांवरील ज्ञान इत्यादी ते लगेच नोंद करून ठेवतात. यामुळे समष्टीला अध्यात्माविषयीचे नाविन्यपूर्ण ज्ञान उपलब्ध होत आहे.

## ४. 'साधनाप्रवास' या ग्रंथमालिकेची काही वैशिष्ट्ये !

**४ अ. अध्यात्मशास्त्र विदित करणारे चरित्र :** सर्वसाधारणपणे चरित्र हे इतिहास किंवा कथा यांच्या स्वरूपात लिहिले जाते. परात्पर गुरु डॉक्टर त्यांच्या गुरूंकडे 'तत्त्व' म्हणून पहात असल्याने परात्पर गुरु डॉक्टरांनी गुरूंच्या मार्गदर्शनाखाली झालेला स्वतःचा साधनाप्रवास 'शास्त्र' म्हणून लिहिला आहे.

**४ आ. विषय नीट समजण्यासाठी कालक्रमापेक्षा विषयांनुसार चरित्राची मांडणी :** सर्वसाधारणपणे चरित्र हे काळानुसार लिहिण्याचा प्रघात आहे. परात्पर गुरु डॉक्टरांचा स्वतःचा साधनाप्रवास लिहिण्याचा मुख्य उद्देश ‘साधकांना साधनेची विविध अंगे सुयोग्यरित्या आणि नेमकेपणाने शिकता यावीत’, हा आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या जीवनातील प्रसंग, वेळोवेळी शिकायला मिळालेली सूत्रे इत्यादी तंतोतंत कालक्रमानुसार न लिहिता अधिककरून त्या त्या विषयानुसार लिहिली आहेत.

## ५. साधकांच्या अंतःकरणात साधनेची शिकवण खोलवर बिंबवणारी ग्रंथमालिका !

परात्पर गुरु डॉक्टर गुरूंकडून जे शिकायचे, ते स्वतः आचरणात आणायचेच; पण साधकांकडूनही ते तसे आचरण करवून घ्यायचे. याचे एक उदाहरण याप्रमाणे आहे. एकदा परात्पर गुरु डॉक्टर गुरूंच्या आश्रमात गेले असता गुरूंनी त्यांना सांगितले, ‘‘आश्रमाची झाडलोट करा.’’ याप्रमाणे केल्यावर परात्पर गुरु डॉक्टरांच्या मनात प्रथमच ‘आपला आश्रम’ ही भावना निर्माण झाली. त्यानंतर पुढे प्रत्येक वेळी परात्पर गुरु डॉक्टर गुरूंच्या आश्रमात किंवा गुरुपौर्णिमादी उत्सवांना गेल्यावर तेथील स्वच्छता, आवराआवर आवर्जून करत असत. काही काळाने परात्पर गुरु डॉक्टरांनी सनातनचे आश्रम स्थापन केले. तेथे साधकांमध्येही त्यांनी हा गुण रुजवला आहे.

संत किंवा गुरु यांच्याकडून जे शिकायला मिळते, ते तंतोतंत आचरणात आणतो, तोच खरा सत्‌शिष्य ! परात्पर गुरु डॉक्टर सत्‌शिष्य असल्यानेच अल्पावधीत गुरुकृपेस पात्र ठरून पुढे ‘परात्पर गुरु’ अशी उच्च आध्यात्मिक स्थिती प्राप्त करू शकले. अशा थोर विभूतीमत्वाची वाणी आणि लिखाण यांत स्वाभाविकच चैतन्य येते. परात्पर गुरु डॉक्टरांची ‘साधनाप्रवास’ ही मालिकाही चैतन्यदायी आहे; त्यामुळे ती साधकांच्या अंतःकरणात साधनेची शिकवण खोलवर बिंबवणारी आहे.

## ६. श्री गुरुचरणी प्रार्थना !



‘परात्पर गुरु डॉक्टरांचा साधनाप्रवास’ या ग्रंथमालिकेच्या अभ्यासाने सर्व जिज्ञासू आणि साधक यांना साधनेची स्फूर्ती मिळून त्यांना गुरूंच्या मार्गदर्शनाखाली साधना करून ईश्वरप्राप्ती करून घेता येवो’, ही श्री गुरुचरणी मनोभावे प्रार्थना !’

**– (पू.) श्री. संदीप आळशी, सनातनच्या ग्रंथांचे संकलक** (१७.६.२०२२)

F (DrSP + SStSA-L + DrSP-GBh)

## अखिल मानवजातीचा उद्धार करणारी सनातनची ग्रंथसंपदा !

- ‘अध्यात्म हे चिरंतन टिकणारे एकमेव शास्त्र आहे’, हा सिद्धांत आजच्या विज्ञानयुगातही छातीठोकपणे आणि परखडपणे सांगणारे लेखन !
- बुद्धीप्रामाण्यवादी व्यक्तींच्या बुद्धीवरील अहंमन्यतेचे आवरण दूर करून त्यांना चिरंतन अशा आनंदाकडे घेऊन जाणारे विवेचन !
- अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासातून प्रत्येक व्यक्तीची ऐहिक आणि पारमार्थिक प्रगती साध्य व्हावी अन् अखिल विश्वात सुख, शांती आणि समाधान नांदावे, यांसाठी मार्गदर्शन !
- ग्रंथांतील सत्त्वगुणी विचारांमुळे वायूमंडलात ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांनी युक्त असलेल्या विचारांचे प्रक्षेपण !
- ईश्वरी तत्त्वरूपी शब्दप्रमाणाला धरूनच प्रत्येक ग्रंथ लिहिला असल्याने एक प्रकारे ईश्वराच्या साक्षीने ग्रंथांची निर्मिती !
- ज्ञानातील ईश्वरी चैतन्य, तसेच आनंद व शांती यांची अनुभूती देणारे साहित्य !’

**– श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**